७. आपले गाव, आपले शहर



या चित्रामध्ये गाव व शहर दाखवले आहे. चित्राचे नीट निरीक्षण करा.

१) शहर व गावातील वेगळेपणा खालील मुद्द्यांच्या आधारे समजून घ्या.

- घर
- पोशाख
- वाहने
- उद्योग
- सुविधा

२) याशिवाय तुम्ही गाव व शहर यांत कोणत्या गोष्टी पाहिल्या आहेत त्यांची यादी करा.

HOSPITAL
U & Me Bank
CITY MALL

सांगा पाहू

(१) चित्रातील कोणत्या गोष्टी शेतात तयार होतात ?

(२) या गोष्टी आणखी कोठे मिळतात ?

(३) चित्रातील कोणती गोष्ट कारखान्यात तयार होते ?

(४) या गोष्टी तुम्हांला आणखी कोठे मिळतात ?

(५) या गोष्टींची आपल्याला कशासाठी आवश्यकता असते ?

(६) या गोष्टी ग्रामीण व शहरी भागांत पोहचवण्यासाठी कोणत्या साधनांचा वापर केला जातो ?

- धान्य, भाजीपाला, दूध इत्यादी माल गावातून येतो.
- सायकली, खेळणी, पुस्तके इत्यादी माल शहरातून येतो.
- शेतीची अवजारे, कापड, औषधे, मोटारी, साबण, काच, बल्ब इत्यादी वस्तू कारखान्यांत बनतात. कारखाने मुख्यत: शहरांजवळ असतात. गावात आणि शहरात राहणारे लोक या सर्व गोष्टी वापरतात. शहरी व ग्रामीण लोक आपल्या गरजा भागवण्यासाठी एकमेकांवर अवलंबून असतात.
- लोकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी वाहतुकीची व संदेशवहनाची साधने आवश्यक असतात.

गाव आणि शहर यांच्यात पूर्वी मोठा फरक असे. आता हा फरक कमी होऊ लागला आहे. शहरांमध्ये असणाऱ्या अनेक सुविधा हळूहळू गावांमध्येही दिसू लागल्या आहेत.

● वाहतुकीची साधने

माणसाच्या गरजा वाढत गेल्या, तसा त्याने वाहतुकीच्या नवीन साधनांचा शोध लावला. आधी तो बैल, हत्ती, उंट, घोडा, गाढव अशा जनावरांवरून सामान वाहून नेत असे. पुढच्या काळात बैलगाडी, घोडागाडी अशी साधने आली. मग जहाजे, मोटारी व आगगाडी यांचा शोध लागला. पुढे विमानांचा शोध लागला. त्यामुळे वाहतूक जास्त वेगाने होऊ लागली.



सांगा पाहू

पुढे एका रकान्यात वाहतुकीची साधने व दुसऱ्या रकान्यात ती कशावरून जातात हे दिले आहे. त्यांच्या योग्य जोड्या रेषेने जुळवा.



आता बहुतेक गावांत आणि शहरांत वाहतुकीच्या सोई व सुविधा आल्या आहेत. आपल्या तालुक्यात किंवा जिल्ह्यात वाहतुकीच्या कोणत्या सोई आहेत, कोणती प्रसिद्ध ठिकाणे आहेत ते समजून घेऊया. त्यासाठी तुमच्या जिल्ह्याचा नकाशा अभ्यासा. नकाशावरील कृती पूर्ण करा.

नकाशाशी मैत्री !

१. नकाशात दाखवलेले विमानतळ शोधा. त्याच्या चिन्हाभोवती ◯ करा.

२. नकाशातील राष्ट्रीय उद्यान व गुंफा यांच्या नावांभोवती चौकट करा.

३. तुम्हांला माहीत असलेल्या प्रसिद्ध ठिकाणांच्या चिन्हांना चौकट करा.

४. बृहन्मुंबईमधील दक्षिण भागातील तीन प्रसिद्ध ठिकाणांची चिन्हे रंगवा. त्यांची नावे चौकटीत लिहा.

५. शीवकडून ठाण्याकडे जाणारा लोहमार्ग वेगळ्या रंगाने गिरवा.

सांगा पाहू



१. आजोबा काय वाचत आहेत ?
२. ताई माहिती मिळवण्यासाठी कशाचा वापर करत आहे?
३. आजी काय पाहत आहे ?
४. दादा गाणी ऐकत आहे, त्यासाठी त्याने कानाला काय लावले आहे?
५. बाबा बोलण्यासाठी कशाचा वापर करत आहेत?
६. दारात कोण आले आहे? आई त्यांच्याकडून काय घेत आहे?

पत्र, संगणक, मोबाइल फोन, वर्तमानपत्र, टीव्ही, म्युझिक प्लेअर या गोष्टींचा वापर आपण करत असतो. ही सर्व साधने माहिती व निरोप मिळवण्यासाठी किंवा पाठवण्यासाठी वापरली जातात. ही संदेशवहनाची साधने आहेत.

- **बोलीभाषा**

माणूस हा एकमेकांशी भाषेच्या मदतीने बोलतो, आपले विचार दुसऱ्यापर्यंत पोहचवतो. एकच भाषा वेगवेगळ्या प्रदेशांत वेगवेगळ्या पद्धतीने बोलली जाते. प्रदेशांनुसार त्या भाषेतील शब्दांचे उच्चार बदलतात. तिच्यावर इतर भाषांचा प्रभाव पडतो. इतर भाषांतील शब्द आपल्या भाषेत येतात. अशा पद्धतीने वेगवेगळ्या प्रदेशांत एकाच भाषेच्या बोली तयार होतात. उदा., अहिराणी, मालवणी, वऱ्हाडी या मराठी भाषेच्या काही बोली आहेत. **मराठी** ही महाराष्ट्राची **राजभाषा** आहे.

माहीत आहे का तुम्हांला ?

खूप पूर्वी संदेश पाठवायची प्रगत साधने नव्हती. त्या काळी वेगवेगळ्या पद्धतींनी माहिती पाठवली जायची. कधी कधी त्यासाठी शिकवलेल्या कबुतरांचा वापर केला जायचा. माहिती लिहिलेले कापड किंवा कागद कबुतरांच्या पायांना बांधून संदेश पाठवले जायचे.

काय करावे बरे ?

रोहन आणि रूपाली राहत असलेल्या भागामध्ये मोबाइल फोन, टेलिफोन, संगणक या सेवा उपलब्ध नाहीत. त्यांना परगावच्या नातेवाइकांना निरोप पाठवायचा आहे. तो निरोप पाठवण्यासाठी तुम्ही त्यांना कशी मदत कराल ?

हे नेहमी लक्षात ठेवा

वाहतुकीच्या व संदेशवहनाच्या साधनांचा अलीकडे मोठ्या प्रमाणात विकास झाला आहे, परंतु या साधनांचा जास्त वापर केल्याने प्रदूषणातही वाढ झाली आहे. त्यामुळे प्रत्येकाने या साधनांचा वापर काळजीपूर्वक केला पाहिजे.

आपण काय शिकलो

* गाव व शहर यांचा परस्परसंबंध.
* वाहतुकीची व संदेशवहनाची साधने.
* वाहतुकीच्या व संदेशवहनाच्या सोईंची आवश्यकता.
* आपल्या जिल्ह्यातील, तालुक्यातील वाहतुकीच्या सोई व प्रसिद्ध ठिकाणे.

स्वाध्याय

(अ) भाजीपाला, कांदे, गहू, मोटार सायकल, पुस्तक, टीव्ही, रेडिओ.

(१) वरीलपैकी कोणता माल गावाकडून शहराकडे येतो ?
(२) वरीलपैकी कोणता माल शहराकडून गावाकडे येतो ?

(आ) उतारा वाचा व प्रश्नांची उत्तरे द्या.

पूजा तिच्या मैत्रिणीकडे निघाली होती. तेवढ्यात पोस्टमनकाका पत्र घेऊन आले. पूजाने बसने प्रवास करताना काही लोकांना घोड्यावरून सामान वाहून नेताना पाहिले. ती मैत्रिणीकडे पोचली, तेव्हा तिची मैत्रीण मोबाइल फोनवरून बोलत होती.

(१) वाहतुकीची साधने कोणती ?
(२) संदेशवहनाची साधने कोणती ?

(इ) पेन, कात्री, पत्र, मोबाइल, इस्त्री, बाटली, टेलिफोन, घड्याळ, चश्मा, पुस्तक, टोपी.

- वरीलपैकी संदेशवहनाची साधने कोणती ते शोधा व त्यांना ◯ करा.

(ई) कृती करा.

- तुम्ही पाहिलेल्या गाव व शहराचे चित्र काढा.
  या चित्रात शहराकडून गावाकडे कोणत्या वस्तू येतात, गावाकडून शहराकडे कोणत्या वस्तू जातात ते दाखवा.

उपक्रम

तुमच्या आजी-आजोबांच्या लहानपणी टीव्ही, म्युझिक प्लेअर नव्हते. रेडिओसुद्धा फारच कमी लोकांकडे असायचे. तेव्हा ते मनोरंजनासाठी काय करायचे, हे त्यांच्याशी चर्चा करून जाणून घ्या.

✻✻✻

2B30BF